# SUCCESS KEY TEST SERIES

X (English)

**(Unit Test-1 Marathi (1,2,3,4))**

Marathi-

DATE:

TIME: 2 hrs

MARKS: 40

SEAT NO:

**विभाग १ - गदय**

**प्र. १ उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)**

1 **A1)** चौकटी पूर्ण करा 2

पत्नीने पंतांसाठी या भाज्यांचा खुराक सुरू केला

**Ans.**

पत्नीने पंतांसाठी या भाज्यांचा खुराक सुरू केला

- शेवग्याच्या शेंगा
- पडवळ
- भेंडी
- चवळीच्या शेंगा

शेवटी सर्वांच्या मते मी सकाळी रनिंग करावे आणि संध्याकाळी दोरीवरच्या उड्या माराव्यात असे ठरले आणि मी सातव्या बशीमधली भजी उचलली.

कुटुंबाचा मात्र माझ्या 'डाएटच्या ' बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता, कारण रोज काही काही चमत्कारिक पदार्थ माझ्या पानात पडायला लागले. एके दिवशी नुसती पडवळे उकडून तिने मला खायला घातली. शेवग्याच्या शेंगा, पडवळ, भेंडी, चवळीच्या शेंगा वगैरे सडपातळ भाज्यांचा खुराक तिने चालू केला. कोबी, कॉलिफ्लॉवर वगैरे बाळसेदार मंडळींची स्वयंपाकघरातून हकालपट्टी झाली. सकाळचा चहादेखील सुरुवातीला होता तसा राहिला नाही. बिनसाखरेचा चहा इतका कडू लागत असेल अशी यापूर्वी कधीच कल्पना आली नाही मला.

"चहा सुरुवातीला बिनसाखरेचा असूनही कडू लागला नाही आणि आता का लागतो तेवढं सांग", असे म्हटल्यावर कुटुंबाकडून खुलासा मिळाला.

"हेच ते-म्हटलं ते काय उगीच? अहो, म्हणजे सुरुवातीला मी तुम्हांला जो बिनसाखरेचा चहा दिला तो बिनसाखरेचा नव्हताच मुळी!"

"नव्हता? मग मला बिनसाखरेचा चहा म्हणून काय सांगितलंस?"

"अहो, थोडीशीच राहिली होती साखर, ती संपेपर्यंत म्हटलं घालू. काल संपली. आजपासून बिनसाखरेचा चहा केलाच की साखर न घालता."

"म्हणजे खलास! अग, किती लाख कॅलरीज गेल्या असतील माझ्या पोटात. कसलं कमी होतंय माझं वजन? पण ? सांगितलं का नाहीस मला?"

**A2)** i) एका वाक्यात उत्तर लिहा 1

पत्नीने कोणती भाजी उकडून वाढली ?

**Ans.** पत्नीने पडवळ उकडून वाढली.

ii) कारणे लिहा 1

लेखकाच्या पानात रोज चमत्कारिक पदार्थ पडू लागले कारण

**Ans.** कुटुंबाचा डाएटच्या बाबतीतला उत्सव अवर्णनीय होता.

**A3)** i) प्रतिशब्द उता-यातून शोधा 1

1) स्पष्टीकरण - ...............

**Ans.** स्पष्टीकरण - **खुलासा**

2) प्रभात - ..............

**Ans.** प्रभात - **सकाळ**

ii) दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा 1

स्वयंपाकघर -

**Ans.** स्वयंपाकघर - **पाक, स्वयंपाक, घर, कर**

**A4)** स्वमत 2

पंतांच्या उपसाबाबत त्यांच्या पत्नीचा अवर्णनीय उत्साह तुमच्या शब्दात लिहा.

**Ans.** पंतांची पत्नी उपसाबाबत खूपच उत्साही होती. पंतांचे वजन कमी व्यावे म्हणून त्यांनी पंतांसाठी विविध पौष्टीक भाज्यांचा खुराक चालू केला. रोज चमत्कारिक पदार्थ पानात वाढू लागली. एके दिवशी नुसते पडवळ उकडून तिने खायला घातले. शेवग्याच्या शेंगा, पडवळ, भेंडी, चवलीच्या शेंगा वगैरे सडपातळ भाज्यांचा खुराक तिने चालू केला. कोबी, कॉलिफ्लॉवर वगैरे बाळसेदार मंडळींची स्वयंपाक घरातून हाकलपट्टी झाली. बिनसाखरेचा चहा दररोज देऊ लागली. अशा प्रकारे पंतांच्या पत्नीने त्यांचे वजन कमी करण्यासाठी मदत केली.

**विभाग २ - पदय**

**प्र. २ खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)**

**1** **A1)** कवितेच्या आधारे खालील कृती केव्हा घडतात ते लिहा 2

1) पृथ्वीवर पक्षीण झेपावते. - [ ]

**Ans.** पृथ्वीवर पक्षीण झेपावते. - **जेव्हा तिचे पिल्लू धरणीवर पडते.**

2) माता धावून जाते - [ ]

**Ans.** माता धावून जाते - **जेव्हा बाळ अग्नित पडते.**

अग्निमाजि पडे बाळू । माता धांवें कनवाळू ।।१।।
तैसा धांवे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ।।२।।
सर्वेचि झेंपावें पक्षिणी। पिलीं पडतांचि धरणीं ।।३।।
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे ।।४।।
वणवा लागलासे वनीं। पाडस चिंतीत हरणी।।५।।
नामा म्हणे मेघा जैसा । विनवितो चातक तैसा ।।६।।

**A2)** एका शब्दात उत्तरे लिहा 2

1) चिंता करणारी - [ ]

**Ans.** चिंता करणारी - **हरीण**

2) कनवाळू धावणारी - [ ]

**Ans.** कनवाळू धावणारी - **आई**

3) सेवेसाठी झेपावणारी - [ ]

**Ans.** सेवेसाठी झेपावणारी - **पक्षीण**

4) हंबरत धावणारी - [ ]

**Ans.** हंबरत धावणारी - **धेनू**

**A3)** काव्यसौंदर्य 2

नामा म्हणे मेघा जैसा | विनवितो चातक तैसा या ओळीचा आशय स्पष्ट करा.

**Ans.** अंकिला मी दास तुझा या अभंगाचे कवी संत नामदेव आहेत. परमेश्वराला दास म्हणून स्वीकार करण्याची विनंती करत आहेत. कवी नामदेव सांगतात, जसे मेघासाठी चातक पक्षी निस्वार्थ होऊन विनंती करतो त्याच प्रकारे संत नामदेव सुद्धा परमेश्वराला विनंती करत आहेत मी तुझ्या स्वाधीन झालो आहे. माझा दास म्हणून स्वीकार कर. संत नामदेवांनी चातक व मेघ यांचे सुंदर उदाहरण देऊन स्वत:च्या मन:स्थितीचे वर्णन केले आहे.

**A4)** स्वमत 2

संत नामदेवांनी परमेश्वराकडे केलेली विनंती सोदाहरण स्पष्ट करा.

**Ans.** संत नामदेव परमेश्वराकडे कृपेची याचना करताना विविध उदाहरणे देत आहेत. जशी आई अग्नित पडलेल्या बाळाला वाचविण्यास धावून येते. पक्षीण झाडावरून पडलेल्या बाळाला वाचविण्यासाठी लगेच झेपावते. हरीण वनाला वणवा लागताच तिच्या पाडसासाठी चिंतित होते. जसा मेघाला चातक पक्षी विनवणी करतो आहे. तसेच संत नामदेव परमेश्वराला कृपेची याचना करत आहेत.

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र. ३ खालील कोणत्याही एक कृती सोडवा.** **(3)**

**1)** टीपा लिहा.
बार्क

**Ans.** **बार्क** - बार्क हे 'भाभा अँटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या नावाने लघुरूप आहे. मी भाभा यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला, म्हणून त्यांचे नाव या संस्थेला दिले आहे. बार्क ही संस्था आता प्रचंड मोठी आहे.

**2)** मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत असे तुम्हांला वाटते?

**Ans.** मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्याची कारणे म्हणजे स्वतःहून कोणीही या कामाकडे लक्ष दिले नाही. यंत्रसामग्री होती, पण काम करणा-या इंजिनियरना मदतीसाठी सहकारी हवे होते. काम सुरू होण्याआधीच लोक खूप प्रकारच्या मागण्या करत. अशा या वृत्तीमुळे आतापर्यंत मेटलायझिंग प्रक्रियेवर काम झाले नव्हते.

**विभाग ४ - भाषाभ्यास**

**प्र. ४(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**(१) समास -** **(2)**

तक्ता पूर्णा करा :

| अ. क्र | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| 1) | .............. | प्रत्येक गावी | .............. |
| 2) | पंचरत्न | .............. | .............. |

**Ans.**

| अ. क्र | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| 1) | गावोगावी | प्रत्येक गावी | अव्ययीभाव |
| 2) | पंचरत्न | पाच रत्नांचा समूह | व्दिगू समास |

**(२) वाक्यप्रचार -** **(2)**

**खालील पादीतील वाक्यप्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरुन वाक्ये पुन्हा लिहा.**

**खालील वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.**
(i) क्रोध येणे
(ii) उलट तपासणी करणे

**Ans.** (i) क्रोध येणे - संतोषने सांगितलेले काम न केल्यामुळे बाबांना क्रोध <u>आला.</u>
(ii) उलट तपासणी करणे - पोलिसांनी पकडलेल्या चोराची उलटतपासणी केली .

**प्र. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**


**विरामचिन्हे** **(2)**

**चुकीची विरामचिन्हे बदला**
अरे वा ? किती लवकर घरी आलास.

**Ans.** अरे वा ! किती लवकर घरी आलास !


**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र. ५.1. खालील विषयावर पत्र लिहा.** **(5)**




**Ans.** .स्वताच्या शब्दात लिहा.

**2. बातमी लेखन** **(5)**




**Ans.** .स्वताच्या शब्दात लिहा.

**3. कथालेखन** **(5)**

**पुढील शब्दांच्या आधारे कथा लिहा.**
नावाडी – पंडीत – सारे जीवन फुकट

**Ans.** .स्वताच्या शब्दात लिहा.